जा.क्र.मसंके/वावि/जसंनि/791/426/२०२३
वाकवली विभाग,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
दिनांक : 10 FEB 2023

# निरूपयोगी कार्यालयीन साहित्य, यंत्र व उपकरणे विक्रीबाबतची जाहिरात

| अ क्र | विभागाचे नांव | अनामत रक्कम रूपये | दरपत्रक उघडण्याचे दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | वाकवली विभाग | ५०००/- | दिनांक २७.०२.२०२३ मंगळवार रोजी दुपारी ३:०० वाजता<br>स्थळ : सभागृह कक्ष मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली |

अटि व शर्ती

१) ठेकेदाराने मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली यांच्या अधिपत्याखाली असणा-या वाकवली विभागातील निरूपयोगी जडवस्तु संग्रह साहित्याची अनामत रक्कमेचा धनाकर्ष (D.D.) 'डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ' या नावाने दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

२) दरपत्रकासोबत पॅनकार्ड, आधार कार्ड च्या छायांकीत प्रती आणि अनामत रकमेचा धनाकर्ष (D.D.)जोडणे आवश्यक आहे, जोडले नसल्यास ते दरपत्रक ग्राह्य धरले जाणार नाहीत.

३) विक्री ही बंद लखोटा पध्दतीने असून भाग घेणा-या ठेकेदाराने आपली रक्कम नमुद करून लखोटा सिलबंद करून वाकवली कार्यालयात उपलब्ध करून देण्यात येणा-या टपाल पेटीमध्ये दिनांक २४.०२.२०२३ रोजी सायंकाळी ५:३० पर्यत कार्यालयीन वेळेपर्यंत टाकण्यात यावेत, उशीरा येणा-या ठेकेदाराचे लखोटे स्विकारण्यात येणार नाहीत.

४) दरपत्रकं उघडण्याची प्रक्रिया दिनांक २७.०२.२०२३ रोजी ठिक दुपारी ३:०० वाजता मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली येथील सभागृहात होईल.विक्री प्रक्रिया ही कार्यालयीन पध्दतीचा अवलंबन करून लखोटे उघडण्यात येतील आणि सर्वात जास्त दर असलेल्या ठेकेदारास सदर निरूपयोगी वस्तुंची उचल करण्यासंबंधी कळविण्यात येईल

५) ज्या ठेकेदाराने सर्वात जास्त दर नमुद केलेला असेल त्याने संपुर्ण रक्कम संबंधीत विभागास भरणा करून पुढील एक आठवडयाच्या आधी कार्यालयीन वेळेत आणि कार्यालय प्रमुखांच्या समक्ष सर्व निरूपयोगी जडवस्तु संग्रह साहित्याची स्वखर्चाने उचल करून वाहतुक करावयाची आहे.

६)वाकवली विभाग आणि बीज प्रक्रिया केंद्र, वाकवली या ठिकाणी असलेले निरूपयोगी जडवस्तु संग्रह साहित्य "जेथे आहे जसे आहे" प्रत्यक्ष पहाणी या तत्वावर बंद लखोटा पध्दतीने विक्रि करावयाचे आहे.सदरचे साहित्य दिनांक २०.०२.२०२३ ते २३.०२.२०२३ या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळुन) पहावयास मिळेल.

७) विक्रि केलेले साहित्याबाबत नंतर कोणत्याहि प्रकारची तक्रार चालणार नाही.

८)वरील प्रक्रियेप्रमाणे ज्याचे दरपत्रक मंजूर झाले आहे त्याने दरपत्रकात नमुद केलेली पूर्ण रक्कम एक आठवड्याच्या आत भरणा न केल्यास आणि निरूपयोगी कार्यालयीन साहित्य न उचलल्यास त्याची जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच त्यासंबंधीत निर्णय घेण्याचे अधिकार हे मा. अध्यक्ष, निरूपयोगी जडवस्तू संग्रह साहित्य विक्री समिती यांनी राखून ठेवले आहेत.

९) साहित्याची उचल करताना प्रक्षेत्राचे अथवा कार्यालयाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई संबंधीतांकडून घेण्यात येईल.

१०)साहित्य विक्री करणे अथवा योग्य किंमत न मिळाल्यास विक्री प्रक्रिया रदद करण्याचे अधिकार राखून ठेवलेले आहेत.

११) विक्री प्रक्रियेत अपेक्षीत् रक्कम प्राप्त न झाल्यास सदर विक्री प्रक्रियेत उपलब्ध असलेल्या दरपत्रके धारकांकरवी उघड बोली पद्धतीने निरूपयोगी साहित्याचा लिलाव करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात येत आहे.

१२) सर्वात जास्त दर नमुद केलेल्या पहिल्या तीन ठेकेदारांच्या अनामत रकमेचे धनाकर्ष कार्यालयात जमा करण्यात येतील व उर्वरीत इतर सहभागी ठेकोदारांच्या अनामत रकमेचे धनाकर्ष विक्री प्रक्रिया पुर्ण झाल्यावर परत करण्यात येतील.

अध्यक्ष
विक्री समिती तथा संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली